आत्मदीपो भव !

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

Rambhau Mhalgi Prabodhini

*आयोजित*

# विशाल जुन्नर सहकारी पतपेढी आणि विशाल जुन्नर सेवा मंडळ संचालक व विश्वस्त प्रशिक्षण शिबिर

दि. २६,२७ डिसेंबर, २००९

# प्रशिक्षण शिबिर अहवाल

**<u>प्रशिक्षण शिबिर विषय :</u>**

**दि. २६,२७ डिसेंबर, २००९** रोजी विशाल जुन्नर सहकारी पतपेढी आणि विशाल जुन्नर सेवा मंडळ या दोन संस्थांतील संचालक व विश्वस्तांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर प्रबोधिनीचे ज्ञान नैपुण्य केंद्र, भाईंदर येथे संपन्न झाले. या शिबिरात विशाल जुन्नर सहकारी पतपेढी आणि विशाल जुन्नर सेवा मंडळ च्या कार्यकारिणीतील एकूण २० पदाधिकारी (२० पुरुष) प्रशिक्षणार्थी म्हणून सहभागी झाले होते.

<u>सहभागींच्या संख्येबाबतचा तपशील :</u>

| जिल्हे | महिला | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|
| २ | ० | २० | २० |

शिबिराचे उद्घाटन विशाल जुन्नर सहकारी पतपेढीचे अध्यक्ष श्री. तुकाराम तात्या शिंदे आणि विशाल जुन्नर सेवा मंडळाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार पाडेकर यांच्या हस्ते झाले.

<u>शिबिरातील सत्रांचे विषय:</u>

**१. नेतृत्व विकास आणि निर्णय क्षमता**
**२. विश्वस्त व संचालक यांची कर्तव्ये आणि जबाबदारी**
**३. परस्पर संबंध, गुड गव्हर्नन्स आणि संस्था बांधणी**

शिबिरातील सर्व विषयांची मांडणी प्रशिक्षण शिबिरासाठी आलेल्या सर्व उपस्थित शिबिरार्थींना सहभागी करत चर्चा आणि पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून केली गेली. सहभागींना मार्गदर्शन करण्याकरिता विषयांचे तज्ञ प्रा. सुरेंद्र तन्ना, श्री. श्रीराम पटवर्धन (कर सल्लागार ), श्री. अरविंद रेगे हे वक्ते म्हणून लाभले होते.

**नेतृत्व विकास आणि निर्णय क्षमता** या पहिल्या सत्राची सुरुवात प्रा. सुरेंद्र तन्ना यांनी केली. त्यांनी सुरुवातीलाच शिबिरार्थींना दोन केस स्टडी करायला दिल्या. त्या दोन्ही केसेस नेतृत्व आणि निर्णय क्षमतेची कसोटी बघणा-या होत्या. प्रत्यक्ष निर्णय घेण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात याची उजळणी आणि काही नवीन आयाम या सत्रात चर्चिले गेले.




प्रा. सुरेंद्र तन्ना नेतृत्व विकास आणि निर्णय क्षमता सत्र घेतांना



विश्वस्त व संचालक यांची कर्तव्ये व जबाबदारी सत्र घेतांना श्री. श्रीराम पटवर्धन

**विश्वस्त व संचालक यांची कर्तव्ये आणि जबाबदारी** या दुस-या सत्रात श्रीराम पटवर्धन यांनी संचालक व विश्वस्तांच्या जबाबदारीचे तीन वर्गात वर्गीकरण केले.

१. **वैधानिक जबाबदारी**
२. **आर्थिक जबाबदारी**
३. **सामाजिक जबाबदारी**

वरील तीन्ही जबाबदा-यांचे मुद्देसूद स्पष्टीकरण वक्त्यांनी केले. प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांना नेमकेपणाने आणि माहितीपूर्ण उत्तरे दिली.

परस्पर संबंध, गुड गव्हर्नन्स आणि संस्था बांधणी हे तिसरे सत्र श्री. अरविंद रेगे यांनी घेतले. सत्राची सुरुवात एका छोट्या गोष्टीने केली. हंस पक्षांच्या संघभावनेची ती गोष्ट होती. परस्परसंबंध या विषयाचा या गोष्टीशी खूप चांगल्या पध्दतीने संबंध जोडून हे संबंध कसे जपावेत व त्यासाठी काय करावे याबाबत उत्तम मार्गदर्शन वक्त्यांनी केले.



परस्परसंबंध, गुड गव्हर्नन्स आणि संस्था बांधणी हे सत्र घेतांना श्री. अरविंद रेगे

संस्था बांधणीसाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते व कोणत्या गोष्टी टाळाव्या लागतात याबाबत चर्चात्मक पध्दतीने मार्गदर्शन केले. पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून मुद्देसूद विषय मांडणी केली.

संपूर्ण शिबिराचे संचालन प्रकल्प समन्वयक सौ. मृदुल बापट यांनी केले. श्री. मिलिंद बेटावदकर (कार्यक्रम अधिकारी) हे देखील शिबिराला प्रमुख म्हणून उपस्थित होते.

**सहभार्गींचे अभिप्राय :**

विशाल जुन्नर सहकारी पतपेढी आणि विशाल जुन्नर सेवा मंडळाच्या विश्वस्त व संचालकांनी या प्रशिक्षण शिबिरात उत्साहाने सहभाग घेतला. सर्वच सहभार्गींनी तीनही सत्रांच्या विषयांबाबत आणि वक्त्यांबाबत समाधान व्यक्त केले. या शिबिरातील विषयांमुळे ज्ञानात अधिक भर पडली आणि संस्थेचे कामकाज करतांना या सर्व विषयांचा चांगला उपयोग होईल, अशी प्रतिक्रिया शिबिरार्थींनी व्यक्त केली.

अशाप्रकारचे प्रशिक्षण संस्थेच्या इतर कार्यकर्त्यांसाठी तसेच पतपेढीच्या शाखा व्यवस्थापकांसाठीही वर्षातून किमान दोनवेळा असायला हवे, अशी इच्छा प्रत्येक सहभागीने व्यक्त केली.

*********